# महिला व बालविकास आयुक्तालय

२८,राणीचा बाग ,जुन्या सर्किट हाउस शेजारी ,पुणे ०१.

## प्रसिध्दीपत्रक

महिला व बाल विकास विभागाकडील सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने **१.**संरक्षण अधिकारी गट ब (अराजपत्रित) **२.**वरिष्ठ काळजी वाहक गट-ड या पदाची तात्पुरती निवड व प्रतीक्षा यादी दिनांक १५-७-२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. १.परिविक्षा अधिकारी **२.**वरिष्ठ लिपीक/सांख्यिकी सहायक **३.**संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) **४.**कनिष्ठ काळजी वाहक या संवर्गाची तात्पुरती निवड यादी दिनांक ७-८-२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आली. त्यानुसार **परिवीक्षा अधिकारी, गट क** या संवर्गाकरीता तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये नमुद उमेदवारांची कागदपत्र पडताळणी खालील वेळापत्रकानुसार करण्यात येत आहे.**उर्वरीत संवर्गाच्या कागदपत्र पडताळणीचे वेळापत्रक यथावकाश प्रसिध्द करण्यात येणार आहे.**

| अ.क्र | संवर्गाचे नाव | कागदपत्र पडताळणीचा दिनांक व वेळ | शेरा |
|---|---|---|---|
| २ | परिवीक्षा अधिकारी | **दि.२२-८-२०२५ सकाळी १०.००** | **खुला व अ.जाती** या सामाजिक आरक्षणाअंतर्गत तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश केलेले **सर्व उमेदवार** |
| | | **दि.२३-८-२०२५ सकाळी १०.००** | **अ.जमाती,भज-ब,भज-ड,विमाप्र,इमाव, एसईबीसी व ईडब्लुएस** या सामाजिक आरक्षणाअंतर्गत तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश केलेले **सर्व उमेदवार** |

**कागदपत्र पडताळणीचे स्थळ -**

- **म.गांधी प्रशासन व प्रशिक्षण संस्था,पुणे**
  सामाजिक न्याय व विशेष सहाय्य (समाजकल्याण)
  आयुक्तालय आवार,३ चर्च रोड,आगरकर नगर
  (लँड मार्क-पोलीस आयुक्त कार्यालया शेजारी )
  पुणे ४११००१ **(प्रवासाचे जवळचे ठिकाण -पुणे रेल्वे स्टेशन -अंदाजे ८०० मीटर.)**

१. उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी उपस्थित राहण्यासाठी कोणत्याही स्वरुपाचा दैनिक भत्ता/वाहतुक भत्ता अनुज्ञेय राहणार नाही. उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.**कागदपत्र पडताळणीचा ठिकाणी केवळ उमेदवारांशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवेश देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.**

२. उमेदवारास त्यांनी लेखी परीक्षेची संधी ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार/ माहितीनुसार देण्यात येत आहे. **परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत**.

३. तात्पुरत्या निवड यादीत समावेश करण्यात आलेल्या उमेदवारांनी त्यांचे ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीबाबत (अपलोड केलेल्या कागदपत्रांसह) **सर्व मुळ कागदपत्रांची** सखोल पडताळणी करण्यात येणार आहे. कागदपत्र पडताळणीच्या वेळी सरळसेवा भरती प्रक्रियेच्या अटी व शर्ती नुसार/ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीनुसार विहीत **मुळ कागदपत्रांची पुर्तता न** करणाऱ्या उमेदवारांना/कागदपत्र पडताळणीस उपस्थित न राहीलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही/ शासकीय सेवेच्या कोणत्याही टप्यावर अपात्र ठरविण्याचे/ निवड रद्य करण्याचे/नियुक्ती रद्य करण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास,पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.

४. **तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर बदल /सुधारणा करण्याचे** सर्व अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास,म.रा.पुणे यांनी राखुन ठेवले आहेत.**त्यामुळे अंतरीम निवड /प्रतिक्षा यादीमध्ये समावेश झाला/कागदपत्र पडताळणी पुर्ण झाली याचा अर्थ संबधीत उमेदवार त्या पदावर नियुक्तीस पात्र झाला असे गृहीत धरण्यात येणार नाही.**

५. तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांच्या जाहिरातीमध्ये नमुद अटी व शर्तीनुसार **मुळ कागदपत्रांची पडताळणी/समांतर आरक्षणाबाबतची सक्षम प्राधिकाऱ्याकडुन** पडताळणी सविस्तर झाल्यानंतरच संबधीत उमेदवारांच्या नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. सदर भरती प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने पार पाडण्यात येत असून उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच कोणत्याही व्यक्तीने सदर भरती प्रक्रियेबाबत गैरमार्गाने नोकरी देण्याचे किंवा तत्सम स्वरुपाचे आमिष दाखविल्यास/गैरप्रकार करत असल्यास,अशा भूलथापांना/गैरप्रकारांना बळी न पडता त्याबाबत नजिकच्या पोलीस स्टेशनकडे तात्काळ संपर्क साधून तक्रार करण्यात यावी.तसेच भरती प्रक्रियेबाबत कोणत्याही स्वरुपाचा बाहय त्रयस्थांमार्फत दबाव आणल्यास वा तसा प्रयत्न केल्यास संबधीत उमेदवारांस अपात्र ठरविण्याचे सर्व अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य पुणे यांनी राखून ठेवलेले आहेत.

**७. उमेदवारांनी त्यांचे ऑनलाईन अर्जात नमुद व अपलोड केल्यानुसार खालील क्रमवार सर्व मुळ कागदपत्रे व सदर सर्व कागदपत्रांची एक साक्षांकीत छायांकीत प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सोबत आणावेत.**

| अ.क्र | कागदपत्रांचा तपशिल |
|---|---|
| १. | शासकीय ओळखपत्र<br>**(आधार/वाहनपरवाना/पासपोर्ट/पॅनकार्ड/मतदार ओळखपत्र/बँक पासबुक/महाविदयालयाचे ओळखपत्र)** |
| २. | महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र |
| ३. | दिनांक ३-११-२०२४ रोजी वयाची व जन्मदिनांकाची खात्री करण्यासाठी सादर केलेला पुरावा |
| ४. | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र |
| ५. | जात प्रमाणपत्र |
| ६. | जातवैधता प्रमाणपत्र |
| ७. | **सन २०२४-२५** या वित्तीय वर्षातील उन्नत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र<br>**(अनु.जाती व अनु. जमाती या प्रवर्गातील उमेदवार वगळून)** |
| ८. | **सन २०२४-२५** या वित्तीय वर्षातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकात मोडत असल्याबाबतचे प्रमाणपत्र<br>**(EWS उमेदवारांसाठी)** |
| ९. | जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार पदाच्या शैक्षणीक अर्हतेची कागदपत्र |
| १०. | समांतर आरक्षणाची संबधीत दावा केला असल्यास त्याबाबतची सक्षम प्राधिकाऱ्याची प्रमाणपत्रे<br>**(महिला/खेळाडू/मा.सै/अंशकालीन/भुंकपग्रस्त/प्रकल्पग्रस्त)** |
| ११. | उमेदवार दिव्यांग असल्यास दिव्यांगत्वाचा प्रवर्ग व त्याबाबत केंद्र शासनाच्या केंद्र शासनाच्या स्वावलंबन कार्ड किंवा SADM प्रणालीमार्फत वितरीत करण्यात आलेले दिव्यांग प्रमाणपत्र<br>**(अल्पदृष्टी/कर्णबधीर/अस्थिव्यंग/बहुविकलांगत्व व इतर)** |
| १२. | उमेदवार अनाथ असल्यास त्याबाबत सादर केलेले कागदपत्रे **(संस्थात्मक/संस्थाबाहय)** |
| १३. | MSCIT किंवा समकक्ष संगणक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| १४. | शासकीय सेवेचा अनुभव (असल्यास) |
| १५. | नावांत बदल असल्यास त्याबाबत सादर केलेली कागदपत्रे |
| १६. | जाहिरातीमध्ये नमुद माहितीच्या अनुषंगाने व अपलोड केलेली इतर कागदपत्रे |

दिनांक :- २०-८-२०२५
स्थळ :- पुणे

**(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से**
**आयुक्त**
**महिला बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**